पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 19/02/2020 (मंगळवार)
(सकाळ)

---

## नागपूर (ग्रामीण), जिल्हयातील 19 शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस दल आधुनिकीकरण योजना/स्टुडंट पोलीस कॅडेट (एसपीसी) चे प्रशिक्षणाची सुरूवात

मा.प्रधानमंत्री, भारत सरकार, मा.गृह मंत्री, भारत सरकार, मा.मंत्री मान संसाधन विकास भारत सरकार यांचे वतीले गुरूग्राम येथे 21 जुलै/2018 रोजी स्टुडंट पोलीस कॅडेट (एसपीसी) कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर आयोजीत करण्यात आले होते. स्टुडन्स पोलीस कॅडेट प्रोग्राम अंतर्गत विद्यार्थ्यांना पोलीस यंत्रणे बद्यल जाणून घेण्यास शासन आणि सुरक्षिततेत सक्रिय भागीदार बनण्यास मदत करेल, विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाच्या व्यापक विकासात आणि त्यांच्यात देशभक्ती, सेवेची मुल्ये वाढवण्यास मदत करण्यात क्षमता निर्माण होईल. एसपीसी कार्यक्रम पोलीस दलांच्या कामकाजात क्षुल्लक काम करण्यास आणि प्रत्येकजणांना समाजासाठी समर्पित केलेल्या सेवांचे कौतुक करण्यास मदत करेल, एसपीसी हे सक्रिय सहकारी संघराज्याचेही एक उदाहरण आहे ज्यायोगे संपूर्ण देशाच्या हितासाठी राज्यातील यशस्वी उदाहरणे तयार केली जातात. एमएचएच्या विविध राज्यामधील यशा पासुन अंतर्दृष्टी काढण्यासाठी आणि देशभर हा शानदार कार्यक्रम राबविण्याच्या त्यांच्या उपक्रमाबद्यल कौतुक केले असून सदर योजना आपल्या विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी आणि जबाबदार नागरीकांच्या रूपात वाढण्यास सुसज्य करेल व नविन भारताच्या प्राप्तीसाठी समर्पित करण्यात आले आहे.

पोलीस दल आधुनिकीकरण योजना अंतर्गत महाराष्ट्र शासन अंतर्गत राज्य स्तरीय संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेली असुन सदर समीती मध्ये मा.प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग (अध्यक्ष), मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग (सदस्य) व मा.अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई (सदस्य सचिव) यांची संनियंत्रण समीती गठित करण्यात आलेली आहे.

तसेच जिल्हास्तरीय सुकानु समीती अंतर्गत मा.श्री.रविंद्र ह.ठाकरे (भाप्रसे) जिल्हाधिकारी, नागपूर (अध्यक्ष), श्री.चिंतामन वंजारी, शिक्षणाधिकारी प्राथमीक, जिल्हा परिषद नागपूर (सदस्य) तसेच मा.मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर (सदस्य सचिव) यांची जिल्हास्तरीय सुकानु समीती गठीत करण्यात आलेली असुन सदर समीती अंतर्गत नागपूर (ग्रामीण) जिल्हयातील 19 शासकीय शाळांची निवड करण्यात आलेली असून सदर शासकीय शाळेतील वर्ग–8 वी चे 30 विद्यार्थी तसेच वर्ग–9 वी चे 30 विद्यार्थी यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय सुकानु समीती अंतर्गत खालील शाळांची निवड करण्यात आलेली आहे. 1) नगर परिषद माध्यमीक हायस्कुल, शासकीय विश्रामगृह समोर, कळमेश्वर जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्रीमती पौर्णिमा आनंदराव मेश्राम 2) जिल्हा परिषद हायस्कुल मांढळ, ग्रामपंचायत जवळ मांढळ, तह.कुही, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री.भाऊराव भिलसींग पवार 3) जिल्हा परिषद हायस्कुल कोदामेंढी, सरकारी दवाखान्या जवळ, कोदामेंढी, तह.मौदा, जिल्हा नागपूर श्री.चंद्रकुमार रामकृष्ण तांबे 4) जिल्हा परिषद हायस्कुल, सरकारी

दवाखाण्या जवळ, पाचगांव तह.कुही जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्रीमती कल्पना राजेंद्र लांडे, 5) जिल्हा परिषद हायस्कुल रायपुर, तह.हिंगणा, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्रीमती आभा पांडुरंग धवळे, 6) जिल्हा परिषद हायस्कुल जवळी, तह.भिवापूर, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री.गजानन रामभाऊ मोटघरे, 7) जिल्हा परिषद माध्यमीक शाळा कामठी कॉलरी टेकाडी (डब्ल्युसीएल), कन्हान, तह.पारशिवनी, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री. रवि दौलतराव मांडवकर, 8) जिल्हा परिषद हायस्कुल वडंबा, तह.रामटेक, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री.विजय सोपान थुल, 9) जिल्हा परिषद (माजी शासकीय) माध्यमीक मुलांची शाळा, तहसिल कार्यालय जवळ, काटोल, तह.काटोल, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री.दिनेश महादेवराव धवड, 10) जिल्हा परिषद हायस्कुल ज्युनियर कॉलेज, बस स्टॉप जवळ, पारडशिंगा, तह.काटोल, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री.वसंत पुंडलीकराव बांब्रटकर, 11) जिल्हा परिषद हायस्कुल ॲन्ड ज्युनियर कॉलेज, बोथीया पालोरा तह.रामटेक जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री.चंद्रमोहन अनंतराव पुरानिक, 12) जिल्हा परिषद हायस्कुल निलडोह, एमआयडीसी तह.हिंगणा, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री.सुरेश किसनराव काळबांडे, 13) जिल्हा परिषद हायस्कुल धरमपेठ, नांद, तह.भिवापूर, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्रीमती संज्ञा विलास सुभेदार, 14) नगर परिषद हायस्कुल, पोष्ट ऑफीस जवळ, काटोल जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्रीमती सुलभा सतिश रेवतकर, 15) नगर परिषद हायस्कुल, वार्ड नं.8 नरखेड, तह. नरखेड, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्रीमती वर्षा सुदेश जैन,
16) जी.बी.नगर परिषद हायस्कुल वार्ड नं.10 मोवाड, तह.नरखेड, जिल्हा नागपूर मुख्याध्यापक श्री.ज्ञानेश्वर जी दारोकर, 17) रामजी महाराज देशमुख, नगर परिषद विद्यालय, गांधी वार्ड, रामटेक, तह.रामटेक, जिल्हा नागपूर. मुख्याध्यापक डॉ.मिलींद श्रावणजी चोपकर, 18) नगर परिषद हायस्कुल, तहसिल ऑफीस जवळ, सावनेर, तह. सावनेर जिल्हा नागपूर. मुख्याध्यापक श्री.प्रकाश नथ्थुजी दांडोळे, 19) नगर परिषद राजेंद्र हायस्कुल, सावनेर रोड, खापा, तह.सावनेर जिल्हा नागपूर. मुख्याध्यापक श्री.भाष्कर पुंडलीकराव चौधरी असे एकुण 19 शाळांची निवड करण्यात आलेली आहे.

सदर प्रशिक्षण करीता दोन विभाग करण्यात आलेले असून पहिल्या विभागात खालील प्रमाणे विषय शिकविण्यात येणार आहेत ज्यात (1) पोलीस – गुन्हे प्रतिबंध व नियंत्रण, (2) कम्युनिटी पोलीसींग आणि विद्यार्थी, (3) रस्ता सुरक्षा आणि रहदारी जागरूकता, (4) समाजातील सर्व वाईट गोष्टी विरूध्द लढा, (5) महिला आणि मुलांची सुरक्षा, (6) भ्रष्टाचारा विरूध्द लढा, (7) आपत्ती व्यवस्थापन, (8) मुल्ये आणि नितीशास्त्र, (9) संयम, (10) सहनशिलता, (11) संवेदनशिलता आणि सहानुभुती, (12) वडीलधा–यांचा आदर करणे, (13) वृत्ती, (14) संघभावना, (15) शिस्त ईत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच दुस–या विभागात यातील विद्यार्थी यांना शासकीय कार्यालयाच्या भेटी देवून शासकीय कार्यालयातील होत असलेल्या कामकाजा संदर्भात माहिती देण्यात येईल.

वरील पोलीस दल आधुनिकीकरण योजना स्टुडंट पोलीस कॅडेट (एसपीसी) ची सुरूवात करण्यात आलेली असुन सदर प्रशिक्षण नगर परिषद माध्यमीक हायस्कुल, शासकीय विश्रामगृह समोर, कळमेश्वर जिल्हा नागपूर येथील विद्यार्थ्यांना वरील माहिती व विषयाबाबत एकुण 60 मुले व मुली यांना शिकविण्यास सुरूवात करण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रमात मा. मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांचे मार्गदर्शनात श्री.श्री.अशोक सारंभलकर, उप विभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग, नागपूर जिल्हा यांचे हस्ते दि.18/02/2020 रोजी 15.30 वाजता उद्घाटन करण्यात आले असून सदर प्रसंगी पोलीस दल आधुनिकीकरण योजना स्टुडंट पोलीस कॅडेट (एसपीसी) अंतर्गत संकल्पना व भविष्यात होणा–या चांगल्या विचारांचा प्रभाव पडण्या करीता मार्गदर्शन करण्यात आले.

सदर प्रशिक्षण नोडल अधिकारी श्री.प्रल्हाद धवड, पोलीस उप निरीक्षक, जिल्हा परिषद प्राथमीक विभागाचे नोडल अधिकारी श्री.प्रमोद वानखेडे, तसेच मुख्याध्यापक श्रीमती पौर्णिमा आनंदराव मेश्राम,

नगर परिषद माध्यमीक हायस्कुल, कळमेश्वर तसेच महिला फौजदार चंदा खैरकर, पोलीस हवालदार महेंद्र सरपटे, भरोरा सेल, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांनी 60 मुले व मुली यांना पोलीस दल आधुनिकीकरण योजना स्टुडंट पोलीस कॅडेट (एसपीसी) प्रशिक्षण देण्यास सुरूवात करण्यात आलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर